जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर

10 JUL 2021 पुढारी

# फोटोकॅटॅलिसीस, सौरघट संशोधनात प्र-कुलगुरू डॉ. पाटील देशात दुसरे

## 'टॉप-१५०' संशोधकांत समावेश; सर्वाधिक संशोधन वाचले जाण्याचा बहुमान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

फोटोकॅटॅलिसीस व सौरघट संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठातील ज्येष्ठ संशोधक तथा प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे जागतिक संशोधकांच्या यादीत 'टॉप-१५०'मध्ये तर देशात दुसऱ्या स्थानी पोहोचले आहेत. त्यांचे संशोधनपर लेखन देशात सर्वाधिक वाचले असून, संशोधनास ३७०८ व्ह्यूज मिळाले आहेत. नुकत्याच जाहीर झालेल्या 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा-२०१६-२०२१'मधून यावर शिक्कामोर्तब झाले आहे.



मटेरिअल सायन्स, नॅनोसायन्स, फोटोकॅटॅलिसिस, सोलर सेल डेव्हलपमेंट आदी क्षेत्रांतील संशोधनासाठी डॉ. पाटील यांची आघाडीच्या संशोधकांत गणना केली जाते. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या दोन टक्के संशोधकांमध्ये त्यांचे नाव आघाडीवर होते. २०१६ ते २०२१ काळातील 'स्कोपस' डाटाच्या आधारे फोटोकॅटॅलिसिस व सोलर सेल क्षेत्रात कार्यरत आघाडीच्या ५०० संशोधकांचा 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा' जाहीर झाला. यामध्ये डॉ. पाटील १४७ व्या स्थानी आहेत.

भारतीय संशोधकांच्या 'टॉप-५००'च्या यादीत विद्यापीठातील डॉ. व्ही. एल. पाटील, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. जी. दोङ्मणी, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. एन. एल. तरवाळ या सात संशोधकांना स्थान मिळाले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांची संशोधन क्षेत्रातील कामगिरी सातत्याने चमकदार राहिली आहे. त्यांच्या बरोबरीने विद्यापीठाच्या सात संशोधकांनी आघाडीच्या ५०० संशोधकांत स्थान मिळविले. यातून विद्यापीठातील संशोधनाचा दर्जा सिद्ध होतो. संशोधकांसह कारकिर्दीत सातत्य राखून अनेक मानसन्मान मिळावावेत. त्यासाठी विद्यापीठाचे सहकार्य राहील.

**- डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू

" शिवाजी विद्यापीठ गेली अनेक वर्षे फोटोकॅटॅलिसीस व सौरघट क्षेत्रांत भरीव संशोधन करीत आहे. त्याचेच हे फलित आहे. यापुढील काळात व्यक्तिगत स्तरावर व संशोधक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून संशोधन परंपरा अखंडित पुढे सुरू ठेवणे महत्त्वाचे आहे.

**- डॉ. पी .एस. पाटील,**
प्र-कुलगुरु

### काय आहे 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा'?

'एल्सव्हिअर-सायव्हॅल' ही वेब-बेस्ड संशोधन विश्लेषण प्रणाली असून, २३० देशांतील वीस हजार शैक्षणिक, संशोधन संस्था आणि तेथे कार्यरत संशोधकांच्या कार्याचा लेखाजोखा प्रणालीद्वारे मांडला जातो. संशोधकाचा प्रवास, संशोधनातील प्रवाह, नवसंशोधनाशी त्यांची सांगड अशा अनेक अभिनव पद्धतींने हे विश्लेषण केले जाते. ५५ दशलक्ष प्रकाशित संशोधनांचा डाटा सायव्हॅलकडे आहे. ३०० ट्रिलियन मॅट्रिक व्हॅल्यूच्या आधारे हे विश्लेषण करण्याची क्षमता या प्रणालीत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUL 2021
पुढारी

# ऑनलाईन परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने पुनर्रपरीक्षा सुरु असून शुक्रवारी बी.ए., एम.ए., बीसीए, बी.व्होक, बी.टेक अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. ८५७ पैकी ५६८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. ९ जुलै रोजी पीजी डिग्री इन मास्टर ऑफ व्हॅल्युशन, बीएस्सी., एम.एस्सी.-नॅनो टेक्नॉलॉजी, एमसीए, एमएसडब्ल्यू, एमबीए इन रुरल मॅनेजमेंट, जर्नालिझम अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या.

10 JUL 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे जिल्हास्तरीय युवा महोत्सव ऑनलाईन होणार

## सांगलीचा महोत्सव सोमवारपासून : साताऱ्याच्या तारखा निश्चित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा यंदाचा युवा महोत्सव ऑनलाईन भरणार आहे. प्रत्येक जिल्हानिहाय स्वतंत्र महोत्सवाचे नियोजन झाले असून, सांगलीचा महोत्सव सोमवापासून तीन दिवस होत आहे. कोल्हापूर व साताऱ्याच्या तारखा निश्चित आहेत; पण अजून स्थळ ठरलेले नाही.



कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर एकत्र जमण्यावर मर्यादा आल्याने विद्यार्थ्यांच्या औत्सुक्याचा आणि आनंदाचा क्षण असणारा युवा महोत्सव साजरा होणार की नाही यावर सांशकता व्यक्त होती. गेल्या वर्षी महोत्सव भरलाच नव्हता, त्यामुळे विद्यार्थ्यांचाही हिरमोड झाला होता. यंदा मात्र ऑनलाईन पद्धतीने घेण्याचे धोरण निश्चित करून त्याप्रमाणे नियोजनही करण्यात आले आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या या विद्यापीठात जिल्हानिहाय महोत्सव भरणार आहे. सांगलीचा महोत्सव १२ ते १४ या काळात वाळवा तालुक्यातील इस्लामपूर येथील मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालयात होणार आहे. सोमवारी (दि. १२) सकाळी नऊ वाजता प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अभिनेत्री नमिता पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन होणार आहे. गुगल मीट या ॲपवर हा कार्यक्रम सादर होणार असून, यात सहभागी होण्यासह याचा आनंदही याच ॲपवर घेता येणार आहे.

महोत्सवात पहिल्या दिवशी उद्घाटन झाल्यानंतर रांगोळी, वक्तृत्व, शास्त्रीय गायन, व्यंगचित्र, शास्त्रीय सुरवाद्य असे कलाप्रकार होणार आहेत. दुसऱ्या दिवशी मंगळवारी भित्तीचित्र, शास्त्रीय नृत्य, सुगम गायन, कातरकाम, एकपात्री अभिनय, मेंहदी, पाश्चिमात्य वाद्य वादन अशा स्पर्धा होणार आहेत. बुधवारी महोत्सवाची सांगता वक्तृत्व, पाश्चिमात्य संगीत वादन, मातीकाम, एकल गायन, नकला अशा स्पर्धांनी होणार आहे.

10 JUL 2021

**लोकमत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

फोटोकॅटॅलिसीस, सौरघटवर संशोधन : देशात दुसरे स्थान

# पी. एस. पाटील जागतिक 'टॉप-१५०' संशोधकांच्या यादीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट संशोधनाच्या क्षेत्रात येथील शिवाजी विद्यापीठातील ज्येष्ठ संशोधक, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे जागतिक संशोधकांच्या यादीत 'टॉप-१५०'मध्ये तर देशात दुसऱ्या स्थानी झळकले आहेत. त्याचप्रमाणे या क्षेत्रातील त्यांचे संशोधनपर लेखन देशात सर्वाधिक वाचले गेले आहे. त्यांच्या संशोधनाला ३७०८ इतक्या व्ह्यूज प्राप्त झाल्या आहेत. नुकत्याच जाहीर झालेल्या 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा- २०१६-२०२१'मधून त्यांचे हे स्थान अधोरेखित झाले आहे.



**डॉ. पी. एस. पाटील**

डॉ. पी. एस. पाटील यांची मटेरिअल सायन्स, नॅनोसायन्स, फोटोकॅटॅलिसिस, सोलर सेल डेव्हलपमेंट आदी क्षेत्रांतील संशोधनासाठी जगभरातील आघाडीच्या संशोधकांमध्ये गणना केली जाते. नुकत्याच जाहीर झालेल्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या दोन टक्के संशोधकांमध्येही त्यांचे नाव आघाडीवर होते. 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग'मध्येही ते अग्रस्थानी होते. २०१६ ते २०२१ या कालावधीतील 'स्कोपस' डाटाच्या आधारे केवळ फोटोकॅटॅलिसिस व सोलर सेल क्षेत्रात कार्य करणाऱ्या जगभरातील आघाडीच्या ५०० संशोधकांचा समावेश असणारा 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा' जाहीर करण्यात आला. या यादीमध्ये डॉ. पी. एस. पाटील हे १४७व्या स्थानी आहेत. त्यांच्यावर १३१व्या स्थानी ओडिशा येथील आय.टी.ई.आर. शिक्षा 'ओ' अनुसंधान या संस्थेचे डॉ. के.एम. परिदा हे आहेत. भारतीय संशोधकांच्या यादीत डॉ. पारिदा हे प्रथम स्थानी तर डॉ. पाटील हे द्वितिय स्थानी आहेत.

## काय आहे 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा'?

- 'एल्सव्हिअर-सायव्हॅल' ही वेब-बेस्ड संशोधन विश्लेषण प्रणाली असून २३० देशांतील सुमारे २० हजार शैक्षणिक व संशोधन संस्था आणि तेथे कार्यरत असणारे संशोधक यांचा लेखाजोखा या प्रणालीद्वारे मांडला जातो.
- संशोधन प्रवास, प्रवाह, नवसंशोधनाची सांगड अशा अभिनव पद्धतीने विश्लेषण करुन संशोधकांना पुरविले जाते. जगातल्या पाच हजारांहून अधिक प्रकाशनांच्या २२ हजारांहून अधिक संशोधन पत्रिकांचे विश्लेषण केले जाते.

डॉ. पी. एस. पाटील यांची संशोधन क्षेत्रातील कामगिरी अभिनंदनीय आहे. त्यांच्या बरोबरीने विद्यापीठाच्या अन्य सात संशोधकांनीही देशातल्या आघाडीच्या ५०० संशोधकांत स्थान मिळविले. यातूनही विद्यापीठातील संशोधनाचा दर्जा सिद्ध होतो.

\- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु

गेल्या अनेक वर्षांत शिवाजी विद्यापीठ हे फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट या क्षेत्रांमध्ये भरीव संशोधन करीत आहे. या संशोधन क्षेत्रात सातत्याने आघाडी टिकवून आहे. या पुढील काळातही व्यक्तीगत स्तरावर तसेच संशोधक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ही संशोधन परंपरा अखंडित पुढे चालवित राहणे महत्त्वाचे आहे.

\- डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलगुरु

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUL 2021
लोकमत

# उन्हाळी सत्र परीक्षांसाठी अर्ज भरण्यास सुरुवात

## ५६८ विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मार्च, एप्रिलमध्ये होणाऱ्या उन्हाळी सत्रातील महाविद्यालय व पदवीत्तर ७३८ अभ्यासक्रमासाठीचे परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमध्ये जमा करणे आणि त्यांनतर महाविद्यालयांनी ते विद्यापीठाकडे जमा करण्याबाबतचे तारखांचे नियोजन असणारे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

त्यानुसार विद्यार्थ्यांनी शुल्कासह १४ पर्यंत, विलंब शुल्कासह १९ आणि अतिविलंब शुल्कासह २६ जुलैपर्यंत अर्ज महाविद्यालयाकडे जमा करावयाचे आहेत. महाविद्यालयांनी हे अर्ज १७ ते २८ जुलैपर्यंत विद्यापीठाकडे पाठवावयाचे आहेत. विद्यार्थ्यांनी तत्काळ प्रवेश पात्रता पूर्ण करून परीक्षेचे अर्ज जमा करावेत, काही अडचणी असल्यास पात्रता विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

दरम्यान, शुक्रवारी ऑनलाईन पद्धतीने ५६८ जणांनी परीक्षा दिली. ऑफलाईन फॉर्म भरलेल्यांना विद्यापीठाने फेरपरीक्षा देण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 JUL 2021
तरूण भारत

# गुणवत्तेबरोबरच कौशल्य असणाऱ्यांना रोजगाराच्या संधी

■ ॲड. व्ही. एन. पाटील यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर :** 'महाविद्यालयीन शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना समाजाच्या उद्योग व्यवसायांच्या गरजा, भविष्यातील रोजगाराची स्थिती यांची माहिती असणे आवश्यक आहे. शिक्षण घेतानाच आवश्यक क्षमता, कौशल्ये प्राप्त करू शकतो. विद्यार्थ्यांनी भविष्यातील रोजगाराच्या संधी ओळखून आवश्यक कौशल्ये संपादन करावीत", असे मत कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव ॲड. व्ही. एन. पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर येथे मराठी विभागाच्या वतीने "मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी" या विषयावरील कार्यशाळा ऑनलाइन घेण्यात आली. यावेळी ॲड. पाटील बोलत होते. मराठी विभागप्रमुख डॉ. अरूण शिंदे यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे यांनी स्वागत केले. प्रथम सत्रामध्ये राज्यकर आयुक्त समाधान महाजन यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी उद्योग व सेवाक्षेत्रातील रोजगाराच्या संधी या मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामध्ये डॉ. अलोक जत्राटकर यांनी प्रसारमाध्यमांतील रोजगाराच्या संधीवर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. मनीषा नायकवडी यांनी तर प्रा. कुंभार यांनी आभार मानले.

10 JUL 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

फोटोकॅटॅलिसीस, सौरघटवर संशोधन : देशात दुसरे स्थान

# पी. एस. पाटील जागतिक 'टॉप-१५०' संशोधकांच्या यादीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट संशोधनाच्या क्षेत्रात येथील शिवाजी विद्यापीठातील ज्येष्ठ संशोधक, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे जागतिक संशोधकांच्या यादीत 'टॉप-१५०'मध्ये तर देशात दुसऱ्या स्थानी झळकले आहेत. त्याचप्रमाणे या क्षेत्रातील त्यांचे संशोधनपर लेखन देशात सर्वाधिक वाचले गेले आहे. त्यांच्या संशोधनाला ३७०८ इतक्या व्ह्यूज प्राप्त झाल्या आहेत. नुकत्याच जाहीर झालेल्या 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा- २०१६-२०२१'मधून त्यांचे हे स्थान अधोरेखित झाले आहे.



**डॉ. पी. एस. पाटील**

डॉ. पी. एस. पाटील यांची मटेरिअल सायन्स, नॅनोसायन्स, फोटोकॅटॅलिसिस, सोलर सेल डेव्हलपमेंट आदी क्षेत्रांतील संशोधनासाठी जगभरातील आघाडीच्या संशोधकांमध्ये गणना केली जाते. नुकत्याच जाहीर झालेल्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या दोन टक्के संशोधकांमध्येही त्यांचे नाव आघाडीवर होते. 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग'मध्येही ते अग्रस्थानी होते. २०१६ ते २०२१ या कालावधीतील 'स्कोपस' डाटाच्या आधारे केवळ फोटोकॅटॅलिसिस व सोलर सेल क्षेत्रात कार्य करणाऱ्या जगभरातील आघाडीच्या ५०० संशोधकांचा समावेश असणारा 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा' जाहीर करण्यात आला. या यादीमध्ये डॉ. पी. एस. पाटील हे १४७व्या स्थानी आहेत. त्यांच्यावर १३१व्या स्थानी ओडिशा येथील आय.टी.ई.आर. शिक्षा 'ओ' अनुसंधान या संस्थेचे डॉ. के.एम. परिदा हे आहेत. भारतीय संशोधकांच्या यादीत डॉ. पारिदा हे प्रथम स्थानी तर डॉ. पाटील हे द्वितिय स्थानी आहेत.

## काय आहे 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा'?

- 'एल्सव्हिअर-सायव्हॅल' ही वेब-बेस्ड संशोधन विश्लेषण प्रणाली असून २३० देशांतील सुमारे २० हजार शैक्षणिक व संशोधन संस्था आणि तेथे कार्यरत असणारे संशोधक यांचा लेखाजोखा या प्रणालीद्वारे मांडला जातो.
- संशोधन प्रवास, प्रवाह, नवसंशोधनाची सांगड अशा अभिनव पद्धतीने विश्लेषण करुन संशोधकांना पुरविले जाते. जगातल्या पाच हजारांहून अधिक प्रकाशनांच्या २२ हजारांहून अधिक संशोधन पत्रिकांचे विश्लेषण केले जाते.

डॉ. पी. एस. पाटील यांची संशोधन क्षेत्रातील कामगिरी अभिनंदनीय आहे. त्यांच्या बरोबरीने विद्यापीठाच्या अन्य सात संशोधकांनीही देशातल्या आघाडीच्या ५०० संशोधकांत स्थान मिळविले, यातूनही विद्यापीठातील संशोधनाचा दर्जा सिद्ध होतो.
- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

गेल्या अनेक वर्षात शिवाजी विद्यापीठ हे फोटोकॅटॅलिसीस आणि सौरघट या क्षेत्रांमध्ये भरीव संशोधन करीत आहे. या संशोधन क्षेत्रात सातत्याने आघाडी टिकवून आहे. या पुढील काळातही व्यक्तीगत स्तरावर तसेच संशोधक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ही संशोधन परंपरा अखंडित पुढे चालवित राहणे महत्त्वाचे आहे.
- डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलगुरू

10 JUL 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फोटोकॅटॅलिसीस, सौरघट संशोधनात प्र-कुलगुरू डॉ. पाटील देशात दुसरे

## 'टॉप-१५०' संशोधकांत समावेश; सर्वाधिक संशोधन वाचले जाण्याचा बहुमान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

फोटोकॅटॅलिसीस व सौरघट संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठातील ज्येष्ठ संशोधक तथा प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे जागतिक संशोधकांच्या यादीत 'टॉप-१५०'मध्ये तर देशात दुसऱ्या स्थानी पोहोचले आहेत. त्यांचे संशोधनपर लेखन देशात सर्वाधिक वाचले असून, संशोधनास ३७०८ व्ह्यूज मिळाले आहेत. नुकत्याच जाहीर झालेल्या 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा-



२०१६-२०२१'मधून यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

मटेरिअल सायन्स, नॅनोसायन्स, फोटोकॅटॅलिसिस, सोलर सेल डेव्हलपमेंट आदी क्षेत्रांतील संशोधनासाठी डॉ. पाटील यांची आघाडीच्या संशोधकांत गणना केली जाते. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या दोन टक्के संशोधकांमध्ये त्यांचे नाव आघाडीवर होते. २०१६ ते २०२१ काळातील 'स्कोपस' डाटाच्या आधारे फोटोकॅटॅलिसिस व सोलर सेल क्षेत्रात कार्यरत आघाडीच्या ५०० संशोधकांचा 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा' जाहीर झाला. यामध्ये डॉ. पाटील १४७ व्या स्थानी आहेत.

भारतीय संशोधकांच्या 'टॉप-५००'च्या यादीत विद्यापीठातील डॉ. व्ही. एल. पाटील, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. जी. दोङ्मणी, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. एन. एल. तरवाळ या सात संशोधकांना स्थान मिळाले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांची संशोधन क्षेत्रातील कामगिरी सातत्याने चमकदार राहिली आहे. त्यांच्या बरोबरीने विद्यापीठाच्या सात संशोधकांनी आघाडीच्या ५०० संशोधकांत स्थान मिळविले. यातून विद्यापीठातील संशोधनाचा दर्जा सिद्ध होतो. संशोधकांसह कारकिर्दीत सातत्य राखून अनेक मानसन्मान मिळावावेत. त्यासाठी विद्यापीठाचे सहकार्य राहील.

**- डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू

" शिवाजी विद्यापीठ गेली अनेक वर्षे फोटोकॅटॅलिसीस व सौरघट क्षेत्रांत भरीव संशोधन करीत आहे. त्याचेच हे फलित आहे. यापुढील काळात व्यक्तिगत स्तरावर व संशोधक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून संशोधन परंपरा अखंडित पुढे सुरू ठेवणे महत्त्वाचे आहे.

**- डॉ. पी .एस. पाटील,**
प्र-कुलगुरु

### काय आहे 'एल्सव्हिअर-सायव्हॅल डेटा'?

'एल्सव्हिअर-सायव्हॅल' ही वेब-बेस्ड संशोधन विश्लेषण प्रणाली असून, २३० देशांतील वीस हजार शैक्षणिक, संशोधन संस्था आणि तेथे कार्यरत संशोधकांच्या कार्याचा लेखाजोखा प्रणालीद्वारे मांडला जातो. संशोधकाचा प्रवास, संशोधनातील प्रवाह, नवसंशोधनाशी त्यांची सांगड अशा अनेक अभिनव पद्धतीने हे विश्लेषण केले जाते. ५५ दशलक्ष प्रकाशित संशोधनांचा डाटा सायव्हॅलकडे आहे. ३०० ट्रिलियन मॅट्रिक व्हॅल्यूच्या आधारे हे विश्लेषण करण्याची क्षमता या प्रणालीत आहे.